समाजप्रबोधन व सोयरे संबंध जुळवणारा । घराघरांत अन् मनामनांत पोहचणारा ।।

# मासिक माळी आवाज





संस्थापक - स्व. विजयकुमार नारायण लडकत
वार्षिक वर्गणी रु. २००/-
वर्ष २०, अंक मार्च २०२५ (मासिक)
एकूण पृष्ठे २४

Mali Aawaj • Pune • Vol. 20 • Issue No. 10 • March 2025 (Monthly) • Pages 24





## जागतिक महिला दिन

आदिशक्ती तू,
प्रभूची भक्ती तू,
झाशीची राणी तू,
जगत जननी तू,
मावळ्यांची भवानी तू,
प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू,
सकलांची आई सातजन्माची पुण्याई तू,
आजच्या युगाची प्रगती तू,
तुझी थोरवी महान,
तिन्हीलोकी तुला मान...

**मासिक माळी आवाजतर्फे विनम्र अभिवादन...**

# ❖ पुण्यस्मरण ❖



## कै. नारायण आत्माराम लडकत

मृत्यू दि. ०३.०३.१९८९

आपल्या स्मृतीस भावपूर्ण अभिवादन

रागिणी विजयकुमार लडकत, शुभांगी बाळासाहेब धारमळकर, लीना दशरथ बाळसराफ,
बीना राजेश बुनगे, संतोष नारायण लडकत, सुनीता संतोष लडकत
प्रतिक्षा आदित्य साडेकर, अभिषेक, शुभम, ऋषिकेश,
शुभदा, सृष्टी, विक्रांत, स्वप्नील, देविका

# ❖ चिरंतन आठवण ❖



## सौ. लिला नारायण गडगे

१३ मार्च १९७० हा दिवस आम्ही विसरु शकत नाही.
आई तुळजाभवानीच्या आणि सिध्दी विनायकाच्या कृपेने आपण लग्नाच्या बेडीत अडकलो होतो.
तुझ्या आठवणीतच खुप वर्षे गेली. तू असण्याचा भास सतत होत असतो. तुझी सर्वांना आठवण येते.

**गडगे, भुजबळ, बोंबटकर, घाडगे आणि परिवार**



१. नांव : ***डॉ. हर्षवर्धन चंद्रशेखर भोंगाडे, यवतमाळ***
जन्म ता.: २७/१२/१९९४ जन्मवेळ : स. ११.०७
उंची : ५'.११'' देवक : रक्त गट : O +ve
नोकरी/व्यवसाय : शिक्षण चालू आहे, २ रे वर्ष
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
शिक्षण : एमबीबीएस एमएस (ऑप्थोलॅमॉलॉजी), २ रे वर्ष चालू
जन्म ठिकाण : यवतमाळ
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ७०-८० ह.मा. फेलोशिप
अपेक्षा : एमबीबीएस, एमडी, एमएस, मेडिकल फिल्ड, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, संस्कारी, अनुरुप



२. नांव : ***सुयोग मिलींद गोरे, आनेवाडी, सातारा***
जन्म ता.: ०९/१०/१९९७ जन्मवेळ : दु. ४.३० मि.
उंची : ५'.६'' देवक : सुर्यफुल रक्त गट : O +ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी
इतर माहिती : आई, १ भाऊ व १ बहिण
शिक्षण : बी. फार्मसी, एमबीए
जन्म ठिकाण : सातारा
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ३५ ह.मा.,
अपेक्षा : बी.फार्म, डी.फार्म, सायन्स पदवीधर, अनुरुप



३. नांव : ***प्रणव अमर भोंगळे, न. मुंबई***
जन्म ता.: २८/०६/१९९३ जन्मवेळ : स. ९.५१ मि.
उंची : ५'.११'' देवक : पाणकणिस रक्त गट :
नोकरी/व्यवसाय : नोकरी-लायन्स ब्रिज (वार्सा)
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत
शिक्षण : मास्टर ऑफ एरोस्पेस
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १.५० ला.मा.,
अपेक्षा : सुंदर, मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान पदवीधर, परदेशात तसेच भारतात काम करण्यास इच्छूक, शाकाहारी, अनुरुप




४. नांव : ***गणेश रविंद्र सुरसे, धुळे***
जन्म ता.: २१/०४/१९९८ जन्मवेळ : प. १.२०
उंची : ५'.७'' देवक : रक्त गट : A +ve
नोकरी/व्यवसाय : इन्फोसिस लि., पुणे
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ठिकाण : धुळे
वर्ण : गहूवर्ण बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : ७.५ ला.वा.,
अपेक्षा : बीई, अनुरुप, मनमिळावू



५. नांव : ***यश संजय झगडे, बारामती***
जन्म ता.: १९/०४/१९९७ जन्मवेळ :रा. १०.५५ मि.
उंची : ५'.११'' देवक : रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : व्यवसाय - समाधान हॉटेल (बारामती)
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत.
शिक्षण : बीई मेकॅनिकल इंजिनिअर
जन्म ठिकाण : बारामती
वर्ण : गोरा बांधा : मध्मम
मासिक प्राप्ती : ३० ला.वा.,
अपेक्षा : सुशिक्षित, व्यवसायात मदत करणारी, ५.४च्या पुढे उंची असावी



६. नांव : ***देवेंद्र अविनाश सुर्यवंशी, पुणे***
जन्म ता.: ०६/०७/१९९९ जन्मवेळ : रा. १०.२५ मि.
उंची : १७१ सेंमी देवक : रक्त गट : A+ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे
इतर माहिती : आई, वडील, एकूलता एक
शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ठिकाण : सटाणा, नाशिक
वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : १५ ला.वा.,
अपेक्षा : बीई कोणतेही फिल्ड, आयटी सेक्टर प्राधान्य, नोकरी असावी




७. नांव : ***यश सचिन शिंदे, सातारा***
जन्म ता.: ०१/११/१९९९ जन्मवेळ : दु १२ वा.
उंची : ६' देवक : समुद्रवेल रक्त गट : B+ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी - नेट क्रॅकर, पुणे
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत
शिक्षण : बीटेक मेकॅनिकल
जन्म ठिकाण : सातारा
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ७ ला.वा.,
अपेक्षा : अनुरुप, पदवीधर, नोकरी



८. नांव : ***प्रतिक लक्ष्मण भुजबळ, पुणे***
जन्म ता.: ०९/०१/१९८८ जन्मवेळ : रा. ११.०५
उंची : ५'.१०'' देवक : पाचपालवी रक्त गट : AB +ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी किर्लोस्कर ब्रदर्स लि.,
इतर माहिती : आई, २ बहिणी विवाहीत, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : अनुरुप, उच्चशिक्षित

शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ठिकाण : चिंचवड
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १२ ला.वा.



९. नांव : ***मयुरेश रामचंद्र जगताप, पुणे***
जन्म ता.: ०७/१२/१९९० जन्मवेळ : स. ११.१५ मि.
उंची : ५'.११'' देवक : रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी - टाटा टेक्नॉलॉजी लि.
इतर माहिती : आई, वडील, २ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप

शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ठिकाण : उरळी कांचन
वर्ण : गहू बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : १,३०,०००



१०. नांव : ***अनिकेत सुनिल घारमळकर, पुणे***
जन्म ता.: २४/०७/१९९७ जन्मवेळ : स. ६.१५ मि.
उंची : ५'.७'' देवक : सुर्यफूल रक्त गट : O +ve
नोकरी/व्यवसाय : बांधकाम व्यवसाय
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : कुटूंब वत्सल, पदवीधर

शिक्षण : बीई सिव्हील इंजि.,
डिप्लोमा सिव्हील इंजि.,
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ७ ते ८ ला.वा.



११. नांव : ***समीर लक्ष्मण कापरे, पुणे***
जन्म ता.: ०५/०७/१९९६ जन्मवेळ : रा. १.३० वा.
उंची : ५'.६'' देवक : पाचपालवी, रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी थर्मॅक्स
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत, आजी
अपेक्षा : अनुरुप, पदवीधर

शिक्षण : डिग्री इन्स्ट्रुमेंशन इंजि.
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : सावळा बांधा : मध्यम
मासिक : ६५ ह.मा.,



१२. नांव : ***यशराज शशांक यादव, पुणे***
जन्म ता.: २४/११/१९९४ जन्मवेळ : दु. ११.२० मि.
उंची : ५'.१०'' देवक : पाचपालवी रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : २ दुकाने
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ अविवाहीत
अपेक्षा : ग्रॅज्युएट, बीए, बीकॉम, होम सायन्स, डिप्लोमा कोणताही

शिक्षण : डिप्लोमा इन ॲनिमेशन
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ५०-६० ह.मा.,



१३. नांव : ***गौरव हरिश्चंद्र वाघोले. ठाणे***
जन्म ता.: १७/११/१९९९ जन्मवेळ : प. ३.५५ मि.
उंची : ५'.७'' देवक : पाचपाली, सौंदड रक्त गट : O -ve
नोकरी/व्यवसाय : अकाऊंटंट, वाशी
इतर माहिती : आई, वडील, २ बहिण विवाहीत
अपेक्षा : सुसंस्कृत, अनुरूप

शिक्षण : एमकॉम इन ॲडव्हांस अकोंटंसी
जन्म ठिकाण : ठाणे
वर्ण : सावळा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ३० ह.मा.,



१४. नांव : ***संकेत सुभाष केदारी, पुणे***
जन्म ता.: २४/१०/१९९० जन्मवेळ : दु. १.३० मि.
उंची : ५'.२'' देवक : पाचपालवी, सौंदडी रक्त गट : A +ve
नोकरी/व्यवसाय : मगरपट्टासिटी, ग्रुप
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप

शिक्षण : आयटीआय, इलेक्ट्रिशियन
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : २५ ह.मा.,

# ● मासिक माळी आवाज संपादक व प्रतिनिधी मंडळ ●

**माळी आवाज**

आपले समाजाचे मुखपत्र,
मनामनांत आणि घराघरांत सर्वात
लोक प्रिय, माळी आवाज.



### संस्थापक

स्व. विजयकुमार नारायण लडकत

### संपादिका

रागिणी विजयकुमार लडकत
फोन
**८७६७५ ८१९०६**
**९१५८३ ३३७५८**

### प्रकाशन स्थळ

२३, गौरव को-ऑप. हौ. सोसायटी,
सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे,
आनंदनगर, पुणे - ४११०५१.

### मुद्रण

शिवानी प्रिंटर्स,
शॉप नं, ७८९, १३११ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

### अक्षरजुळणी आणि डिझाईनींग

देवदत्त एन्टरप्रायजेस
योगेश काकडे
गणेश नगर, धायरी,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
मो. ९८८१३०३५९४

### पुणे विभाग

**प्रा. आदेश बनकर**
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

**सौ. कल्पना करपे**
९०८, गोखलेनगर, वीर बाजीप्रभूशाळेजवळ,
पुणे ४११ ०१६. मो. ९९६०४९८८४९

**अंजली भुजबळ**
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

### लातूर विभाग

**प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे**
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर - ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

### सातारा विभाग

**सौ. शीला गिते**
उमेश, कोटेशवर कॉलनी, अर्क शाळेजवळ,
सातारा, मो. ९६२३६९२०४४

**श्री. वसंतराव नेवसे**
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टॅंड मागे,
मु. पो. वाई, जि. साताराण
मो. ८१४९०१३८६५

### औरंगाबाद विभाग

**सौ. चंद्रकला पाथरे**
प्लॉट नं. १८, बिजली नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद.
मो. : ९४२०२४२१६५

### वधूवर नोंदणी फी

इंटरनेट, सर्व संचालकांकडे नोंदणी,
१ वर्षासाठी : रु. २३००/- +
क्लासिफाईड रु. ३००/- +
वार्षिक वर्गणी रु. २००/- = २८००/-

### नाशिक विभाग

**सौ. उज्ज्वला कमोद**
फ्लॅट नं.११, तिसरा मजला, श्रीनंद अपार्टमेंट ,
अपेक्स हॉस्पिटल, चौक नं. ४, गोविंदनगर,
नाशिक -४२२०११
मो.९८६७५१९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

### सोलापूर विभाग

**श्री. प्रसन्नकुमार शिंदे**
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बॅंकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

### ठाणे कल्याण विभाग

**सौ. शुभांगी शिंदे**
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट - ४००६०५
मो.: ८७७९५३८८२६

**सौ. उज्ज्वला कमोद**
आदर्श सोसायटी, डी-९/२०५,
सेक्ट.-९, घरोंदा, घणसोली,
नवी मुंबई ४००७०१. मो.: ९८६७५१९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

**सौ. रंजना जाधव**
फ्लॅट नं. २०४, शिशिर सुदामा, आर. एम/९५,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, निवास, डोंबीवली, (पू) ४२१२०३
मो ९१६७७७३५६६ / वेळ : दु. १२ ते ४

### मासिकाची वार्षिक वर्गणी

रु. २००/-
**वधू-वर सूचक केंद्र**
**कार्यालय**
१, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर,
नं.२ शेजारी, बिबवेवाडी,
पुणे - ४११०३७
फोन : ०२०-२४२८१११०

# ❖ अंतरंगात ❖


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय – जागतिक महिला दिन | ६ |
| २. | रंगांचा उत्सव – होळी | ८ |
| ३. | स्त्री मुक्तीची आद्य प्रणेती क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले | १० |
| ४. | जुळवून घ्या | १२ |
| ४. | रंगरंगीला राजस्थान–जयपूर – भाग २ | १३ |
| ५. | वधू–वर सूची | १५–२० |
| ६. | क्लासिफाईड | ३, ४, २२, २३ |



**फार्म ४ (नियम ८ नुसार)**

**माळी आवाज मासिकाच्या**
**स्वामित्व व अन्य विषयांसंबंधी विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | २३, गौरव को–ऑप. हौ. सोसायटी सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे, आनंदनगर, पुणे ४११०४१. |
| प्रकाशन काळ | : | मासिक |
| प्रकाशक | : | रागिणी विजयकुमार लडकत |
| पत्ता | : | २३, गौरव को–ऑप. हौ. सोसायटी सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे, आनंदनगर, पुणे ४११०४१. |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| मुद्रक | : | रागिणी विजयकुमार लडकत |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| स्वामीत्व | : | रागिणी विजयकुमार लडकत |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| संपादिका | : | रागिणी विजयकुमार लडकत |
| पत्ता | : | २३, गौरव को–ऑप. हौ. सोसायटी सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे, आनंदनगर, पुणे ४११०४१. |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |

मी रागिणी विजयकुमार लडकत असे घोषित करते की माझ्या माहिती प्रमाणे वर दिलेली माहिती व विवरण खरे आहे.

रागिणी विजयकुमार लडकत
मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादिका


# संपादकीय



## जागतिक महिला दिन

वात्सल्य, मांगल्य, मातृत्व, कर्तुत्व या साऱ्या गुणांचा परिपाक म्हणजे स्त्री होय. आई, बहीण, मुलगी, मैत्रीण, पत्नी, सासू, सून, वहिनी अशा अनेक भूमिका समर्थपणे निभावताना सबल नारीला आपण सगळीकडे पाहतो. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वामुळे आज स्त्रियांनी दाही दिशा पादाक्रांत केल्या आहेत. प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री आपले कार्यकर्तृत्व सिद्ध करत आहे. शिक्षण, प्रशासन, अभिनय, न्याय, वैद्यकीय, क्रीडा, कला, पोलीस अशा अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. आज गल्ली ते दिल्ली महिलांनी आपल्या कामाचा प्रभाव सगळीकडे पाडलेला आहे.

८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. ८ मार्च १८५७ या दिवशी अमेरिकेतल्या कापड गिरणीत काम करणाऱ्या असंख्य महिलांनी आपल्या मागण्यांसाठी आणि हक्कांसाठी गिरणी मालकाविरुद्ध लढा दिला. यानंतर ८ मार्च १९१७ या दिवशी रशियामध्येही महिलांनी अन्यायाविरुद्ध बंड केले. हे बंड करताना त्यांनी सम्राट झारला राजगादी वरून खाली खेचले आणि जुलूम, अत्याचार यांनी परिपूर्ण असलेली झारशाही नष्ट केली. यामुळेच ८ मार्च हा जागतिक ऐतिहासिक दिवस सगळीकडे महिला दिन म्हणून साजरा केला जातो.

आपल्या भारत देशामध्ये ही २५ मार्च १८९० या दिवशी समाजसुधारक नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या रेसकोर्स मैदानावर गिरणी कामगारांच्या सभेमध्ये दोन महिला कामगारांनी उत्स्फूर्तपणे भाषण करून सभेला संबोधित केले. त्यानंतर २५ मार्च १८९४ रोजी मुंबईत सुपारी बागेत जेकब मिलमधील सुमारे ४०० महिला कामगारांनी कामाच्या मोबदल्यात पैसे मिळत नाहीत म्हणून संघटित

होत या जुलूम विरुध्द अन्यायाविरुद्ध लढा दिला. हा कष्ककरी महिलांचा पहिला उठाव होता. १०० वर्षापूर्वी भारतात झालेला हा उठाव ही अभिमानास्पद बाब होती.

तसे पाहिले गेले तर वेदकाळात मुलींना शिक्षण दिले जाळ. गुरुकुलामध्ये सहशिक्षण होते. गार्गी, मैत्रेय, लोपामुद्रा, कैकयी या विदुषी होत्या. स्त्रियांना लष्करी शिक्षणही दिले जाई. त्याकाळी प्रौढ विवाह व स्वयंवर पद्धती अस्तित्वात होती. देवकी, यशोदा, गांधारी अशा अनेक विविध स्त्रिया तत्कालीन समाज जीवनाचे प्रतिनिधित्व करताना आपल्याला पाहायला मिळतात. परंतु मध्ययुगीन काळात मात्र स्त्री अनेक जुनाट रूढी, परंपरा, चालीरीती यांनी जखडली गेली. याकाळी बालविवाह, विधवांचा प्रश्न, केशवपन, बहुपत्नीत्व, सतीप्रथा यासारख्या अनेक चालीरीतीनी स्त्री पोखरली गेली. स्त्रियांचे घराबाहेर पडणे, शिक्षण घेणे निषिद्ध ठरविले जाऊ लागले. पुरुषप्रधान संस्कृतीचे वारे जोमाने वाहू लागले. यामुळे मध्ययुगात स्त्रीच्या कर्तुत्वाला बांध बांधले जाऊ लागले.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्त्री आंदोलने करण्यासाठी घराबाहेर पडली स्त्रियांचा विकास, त्यांची प्रगती वेगाने होऊ लागली. स्वातंत्र्यलढ्यात स्त्रीशक्ती पणाला लावणाऱ्या सरोजिनी नायडू, अरुणा असफअली, के. लक्ष्मी स्वामीनाथन अशा अनेक स्त्रियांनी आपल्या शक्तीची ओळख जगाला दाखवून दिली. स्वतंत्र भारतामध्ये प्रगतीच्या आणि विकासाचे वारे जोमाने भाऊ लागले स्त्रिया सुशिक्षित झाल्या. स्त्री शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. इंदिरा गांधी, किरण बेदी, पी.टी. उषा, कल्पना चावला, मेरी कोम, मेधा पाटकर, सिंधूताई सपकाळ या स्त्रियांनी त्यांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकर्तृत्व गाजवले आहे. स्त्रियांची गळचेपी थांबावी या उद्देशाने अनेक संघटना अस्तित्वात आल्या. कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आरोग्य, आर्थिक, जागतिकीकरण अशा अनेक क्षेत्रातून अष्टभुजा स्त्रीचे रूप प्रकट होऊ लागले. त्याग सेवा निष्ठा पातिव्रत्य, पावित्र्य, मनोमिलन यासारख्या शब्दांनी स्त्रियांचा शब्दकोश भरू लागला.

अनेक सामाजिक व कौटुंबिक प्रश्न स्त्री घराबाहेर पडल्यामुळे निर्माण झाले. कौटुंबिक हिंसाचार, सासुरवास, बलात्कार, विनयभंग, एकतर्फी प्रेमाचे बळी, विधवा स्त्रियांचे प्रश्न, स्त्रीभ्रूणहत्या, हुंडाबळी, देवदासी, वेशांचे प्रश्न समाजापुढे आ वासून उभे आहेत. घरातील जबाबदारी बरोबर बाहेरील जबाबदारी सांभाळताना तिला तारेवरची कसरत सहन करावी लागते. अर्थार्जनासाठी बाहेर पडताना तिला अनेक शारीरिक, मानसिक तक्रारींना बाजूला ठेवून केवळ कर्तव्याला महत्त्व देताना जीवाची ओढाताण करावी लागते.

आजची स्त्री उच्चशिक्षित आहे तेवढीच ती संकुचित आणि स्वार्थी झाली आहे. स्वतःचे कुटुंब, स्वतःची नोकरी स्वतःचे पद प्रतिष्ठा या चक्रव्यूहात ती अडकली आहे. चूल आणि मूल या बंधनातून मुक्त झालेली स्त्री अनेक यशाची शिखरे गाठत आहे. परंतु आजही आपल्याला या स्वतंत्र भारतामध्ये महिलांकडे पाहताना एक प्रश्न पडतो की खरोखरच आजची महिला ही सुरक्षित आहे का? महिलांवर अनन्वित अत्याचार होताना आपण पाहत आहोत. काही ठिकाणी महिलांच्याही वागण्यावर मर्यादा राहिलेली नाही असे दिसून येते. देह प्रदर्शन, व्यसनाधीनता यामध्ये काही महिलाही सक्रिय आहेत असे चित्र दिसते. या साऱ्या गोष्टींचा सांगोपांग विचार महिलांनी करून त्या पद्धतीने आपल्या जीवनात समतोल साधून समाजाचा एक महत्त्वाचा भाग होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

' माता न तू वैरिनी' ही भूमिका न स्वीकारता 'माता न मी जगत् माता' ही विशाल भूमिका स्त्रियांनी स्वीकारणे आवश्यक आहे. समाजातील सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकर्तृत्व गाजवणाऱ्या माझ्या सर्व माता, भगिनी आणि माझ्या मैत्रिणींना जागतिक महिला दिनाच्या मासिक माळी आवाज परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा!

***मासिक माळी आवाज कार्यालयीन वेळ***
मंगळवार ते शनिवार - संध्याकाळी ४ ते ७
रविवार - सकाळी ११ ते २ • सोमवार सुट्टी

# *रंगांचा उत्सव- होळी*



**बीना राजेश बुनगे**
माध्यमिक शिक्षिका – सेवासदन संस्था, पुणे
धायरी, पुणे – ४१.
मो.: ९८८१५८५०४०

यंदाच्या वर्षी प्रशालेत स्नेहसंमेलनात भारतीय 'सण आणि उत्सव' हा विषय घेण्यात आला. त्या अनुषंगाने माझ्या नववीच्या वर्गाला होळी या सणावर आधारित समूहनृत्य सादर करायचे होते. मग काय विद्यार्थिनी एकदम खुश. लगेचच गाण्यांची निवड करणे सुरू झाले. अगदी जुन्या काळातील गाण्यांपासून ते आत्ताच्या गाण्यांपर्यंत शोध मोहीम सुरू झाली. गाण्यांचे फ्युजन करून छान नृत्य बसवले. पांढरा ड्रेस, त्यावर रंगीबेरंगी ओढणी, गालाला रंग लावून विद्यार्थिनींनी अप्रतिम नृत्य सादर केले व होळीच्या नृत्यात सर्व प्रेक्षक वर्गाला चिंब भिजवून टाकले. या नृत्यातून नैसर्गिक रंग वापरा, जीवनात आनंद लुटा, मतभेद विसरा असे मोलाचे सल्लेही विद्यार्थिनींनी दिले. सर्वांच्या मनाला हे नृत्य भावले. प्रेक्षक वर्गानेही ताल धरला. नृत्याच्या उत्स्फूर्त ठेक्यात, हास्याच्या, आनंदाच्या वर्षावात सर्वजण भिजले.

खरंच होळी हा आपल्या भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण आहे. वसंत ऋतूत येणारा हा सण सर्वधर्मीय भारतवासी साजरा करतात हे या सणाचे वेगळेपण आहे. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला होळी पौर्णिमा येते. होळी जळाली आणि थंडी पळाली असे म्हटले जाते म्हणजेच हिवाळा संपल्याची आणि उन्हाळा सुरू झाल्याची जाणीव होळीचा सण आपल्याला करून देतो.

होळीचा अर्थच मुळी जाळणे, अग्नी प्रज्वलित करणे, नष्ट करणे, पेटवणे, दहन करणे असा होतो. 'हुताशणी पौर्णिमा' 'शिमगा' 'धुळवड' 'वसंतोत्सव' 'फाल्गुनोत्सव' अशा अनेकविध टोपण नावांनी होळी सणाला संबोधले जाते. आपले भारतीय सण आणि आख्यायिका यांची नाळ एकमेकांशी घट्ट बांधलेले असते पौराणिक कथा पुढे मनुष्य नतमस्तक होतो अशाच पुराण कथा होळी सणामागेही आहेत.

'इडा पिडा टळु दे आणि बळीचे राज्य परत येऊ दे' या म्हणीप्रमाणे बळी वंशातील अनेक राजे हे कृषीप्रधान होते. म्हणूनच शेतकऱ्यालाही आपण बळीराजा म्हणून संबोधतो ते याचमुळे. धुलीवंदनाच्या दिवशी हाच आपला बळीराजा शेतीच्या मशागतीचा शुभमुहूर्त करतो.

दुसऱ्या हिंदू पौराणिक कथेनुसार कृष्णाचा काळा सावळा रंग असल्याने राधा आपल्याला स्वीकारेल की नाही असा प्रश्न श्रीकृष्णाला पडला .त्यावेळी कोणतेही मतभेद लपवण्यासाठी राधाच्या चेहऱ्यावर वेगळा रंग लाव असे यशोदेने सांगितले त्यानुसार श्रीकृष्णाने गुलालाचा वापर करून राधाच्या गालाला गुलाबी रंग लावला. तेव्हापासून होळीच्या उत्सवाला सुरुवात झाली असे म्हणतात. अर्थातच या आख्यायिकेवर काहीजण आक्षेप घेतात कारण राधा हे पात्र अस्तित्वातच नव्हतं असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. हा भाग सोडला तर राधा कृष्णाच्या प्रेमाचे प्रतीक म्हणूनही होळी साजरी केली जाते.

हिरण्यकशिपू राजा हे प्रल्हादाचे वडील. भक्त प्रल्हाद हा भगवान विष्णूचा परमभक्त. त्याची भक्ती हिरण्यकशिपूला मान्य नव्हती म्हणूनच त्याने एक योजना आखली. त्याची बहीण होलिका हिला वरदान मिळाले होते की कोणतीही आग तिला जाळू शकणार नाही याचाच फायदा घेत हिरण्य कशिपूने तिला

प्रल्हादाला मांडीवर घेऊन अग्नीच्या चितेवर बसण्यास सांगितले. स्वतःच्याच मुलाची हत्या करायला निघालेला हा बाप किती कृतघ्न आणि निष्ठूर म्हणायचा. प्रल्हाद हा भगवान विष्णूच्या नामस्मरणात गुंग होता. होलीका मात्र जळायला लागली कारण तिला वरदानात हेही सांगण्यात आले होते की ती जेव्हा वरदानाचा दुरुपयोग करेल तेव्हा तीही जळून राख होईल. भक्त प्रल्हादाला अग्नीने काहीही केले नाही. होलीका मात्र जळून भस्म झाली. दुष्टांचा विनाश झाला. भक्तीचा विजय झाला.

होळीचा सण संपूर्ण भारतभर उत्साहात साजरा केला जातो. देवळासमोर किंवा सोयीच्या ठिकाणी पौर्णिमेच्या सायंकाळी होळी प्रज्वलित केली जाते. पूजनाच्या स्थानी शेणाने सारवून तेथे रांगोळी काढली जाते .मधोमध एरंड किंवा ऊस उभा केला जातो. त्याच्याभोवती गोवऱ्या व लाकडे रचली जातात. त्यानंतर तूप, कापूर यांचा वापर करून होळी पेटवली जाते. पेटत्या होळीभोवती पाणी फिरवून पुरणपोळीचा नैवेद्य व नारळ होळीला अर्पण केला जातो.

होळीच्या दुसऱ्या दिवशी धुळवड साजरी केली जाते. या दिवशी होळीची राख व माती अंगाला लावली जाते. धरणी मातेला नमस्कार करण्याची ही प्रथा आहे. पृथ्वी, आप, तेज ,वायू ,आकाश या पंचमहाभूतांपासून आपला देह बनलेला आहे. होळीची राख ओली करून अंगाला लावून नंतर जर सूर्याच्या उष्णतेने गरम केलेल्या पाण्याने अंघोळ केली तर उन्हाळा बाधत नाही, शरीर शांत व शीतल राहते असे म्हटले जाते. परंतु, अलीकडच्या काळात दुसऱ्या दिवशीच सर्वजण रंग खेळतात. पाण्याने भिजतात. तसे पाहिले गेले तर होळीनंतर पाचव्या दिवशी रंगपंचमी येते.

होली के दिन दिल खिले जाते है
रंगो मे रंग मिल जाते है
गिले शिकवे सब भूलकर
दुश्मन भी गले मिल जाते है।

या गाण्यानुसार खरंच होळीचा उत्सव हा प्रेमाचा उत्साहाचा चैतन्याचा उत्सव आहे. ‘बुरा ना मानो होली है’’, असे म्हणत प्रत्येकजण एकमेकांना रंग लावत असतात. पाण्याने भरलेले फुगे एकमेकांच्या अंगावर फोडण, पाण्याने भरलेल्या पिचकारीने एकमेकांना चिंब ओले करणे, रंग उधळणे अशा अनेकविध आविष्कारानी या सणाचा  मनमुराद आनंद सर्वजण लुटत असतात.

वसंत ऋतूत निसर्गात विविधरंगी फुले बहरलेली असतात. आपणही निसर्गातील ही रंगांची उधळण पाहून तृप्त व्हायला पाहिजे. वृक्षतोड न करता वाळक्या काड्यांचा वापर करून हा सण आपण साजरा केला पाहिजे. वसंतात झाडांची पानगळती होते परंतु झाडाला पुन्हा नवी पालवी फुटते. आपणही पानगळतीकडून जगण्याचं शहाणपण शिकत आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर सुखी, आनंदी, चैतन्यशील राहायला शिकले पाहिजे. होळीत आपण आपल्यातील विकारांची जळमटे, मनातील किल्मिष, सूक्ष्म अहंकार यांचे दहन केले पाहिजे. जे जुनं आहे अमंगल आहे कालबाह्य आहे त्या सर्वांचा जाळून नाश करायचा. नव्याचा, उदात्ततेचा स्वीकार करायचा. रंगपंचमीच्या रंगात बेभान होऊन जीवनाचा आनंद लुटायचा.

चला तर मग आपणही होळीच्या या पवित्र अग्नीमध्ये निराशा, दारिद्र्य, आळस, दुःख यांचे दहन करूयात आणि सुखी, आनंदी व आरोग्यपूर्ण जीवन जगूया.



**होळी व धुलिवंदनच्या हार्दिक शुभेच्छा !**

# स्त्री मुक्तीची आद्य प्रणेती क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले



**शीला गिते**
बीए., बीएड, सातारा
दलित मित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र भूषण

सामाजिक क्रांतीच्या आद्य प्रणेता त्या प्रथम स्त्री शिक्षणाच्या आद्य शिक्षिका व स्त्री मुक्ती चळवळीच्या सामाजिक क्रांतीची ज्योत पेटविणाऱ्या सावित्रीबाई फुले ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगांवच्या कुशीत जन्मल्या. त्या नायगांवच्या खंडोजी नेवसे पाटील यांच्या कन्या असल्याने बालपणापासूनच बाणेदार, मुत्सद्दी, बंडखोर, धाडसी वृत्तीच्या होत्या. बालपणी योग्य संस्कार झाल्यामुळे भावी जीवनात सामाजिक क्रांतीच्या लढ्याला त्या यशस्वीपणे सामोऱ्या जाऊ शकल्या.

सन १८४० साली या हिऱ्याला थोर सामाजिक क्रांतीकारक महात्मा फुलेचे कोंदण मिळाले. या विवाहामुळे महाराष्ट्राच्या क्षितिजावर परिवर्तन चळवळीतील अग्रणी दांपत्याचा उदय झाला. सावित्रीबाई विवाहाच्यावेळी अक्षरक्षत्रु होत्या. परंतू शतकानुशतके स्त्रियांच्या पायातील गुलामगिरीच्या बेड्या तोडून तिला साक्षर करुन तिला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी थोर समाजसुधारक महात्मा फुल्यांनी सावित्रीबाईंना घरीच शिक्षणाचे धडे देऊन त्यांना प्रथम स्त्री शिक्षिका बनविल्या.

इ.स. १८४७च्या दरम्यान महाराष्ट्रात धर्मांध शक्तींनी किळसवाण्या रुढी व परंपरांच्या सहाय्याने स्त्रीया व दलितांचे भयंकर शोषण चालविले होते. त्यांचे जीवन पशुतुल्य बनवून अन्वनीत छळ चालू होता. स्त्रीयांचे बालविवाह, विधवांचे केशवपन तर सतीच्या नावावर पेटत्या चितेवर स्त्रियांना ढकलले जाई. असहाय्य, निराधार विधवांच्या किंकाळ्या साऱ्या पुण्यात घुमत होत्या. तो काळ स्त्रियांचा अतिशय कठीण होता. स्त्रिला शिक्षण दिले तर धर्म भ्रष्ट होतो या धर्ममार्तंडाच्या कोल्हेकुईला न जुमानता सनातनांच्या प्रखर विरोधाला न जुमानता स्त्री, क्षुद्रांना शिक्षण देण्यासाठी पुण्यात भिडे वाड्यात मुलींच्यासाठी पहिली शाळा काढली. तो दिवस होता १ जानेवारी १८४८ दलित वस्तीत दुसरी शाळा १५ मे १८४८ रोजी सुरु केली. ही शिक्षणाचा वेलू ४ वर्षात गगनावरी नेला. महाराष्ट्रात २० ते २२ शाळा काढून नेटाने चालविल्या. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे हे सांगताना त्यांनी म्हटले आहे की,

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली । गतिविना वित्त गेले ।।
वित्ताविना क्षुद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

शाळा चालविताना सावित्रीबाईंनी शेण, दगड यांचा मारा, टिंगल व शेवटी गुंड मारेकरी यांचा असह्य छळ सहन करीत शिक्षणदानाचे असिधाराव्रत चालू ठेवले. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील महान कार्याबद्दल १६ नोव्हेंबर १८५२ रोजी मेजर कॅडीले यांनी त्यांचा सत्कार केला. या आदर्श शिक्षिकेने सत्काराला अस्खलित इंग्रजीत उत्तर दिले. त्यांनी शाळांबरोबरच अनेक शिक्षिकासाठी ट्रेनिंग स्कूल काढली. नविन प्रशिक्षेत शिक्षिका घडविल्या.

सावित्रीबाईंना स्वतःची मुले नव्हती, परंतू समाजाने टाकलेल्या अनाथ मुलांच्या निराधार विधवा मातांच्या त्या आई बनल्या. ता. २८ जानेवारी १८५३ रोजी त्यांनी आपल्या वाड्यात ''बाल हत्या प्रतिबंधक गृहाची'' स्थापना करुन बाल विधवा, निराधारांना

आश्रय देऊन मातेच्या ममतेने त्यांची १00 बाळंतपणे केली. केशवपनाची क्रुर अनिष्ठ रुढी बंद करणयासाठी न्हाव्यांचा संप घडवून आणला. महाराष्ट्रात इ. स. १८७६ व इ. स. १८९६ दरम्यान दुष्काळ पडला असताना स्त्रिया अतिशुद्रांचे अन्वनित हाल होत होते. परंतु फुले पतीपत्नींनी सुमारे २000 दलित मुलामुलींसाठी अन्नछत्र चालवून या भयंकर संकटातून त्यांची मायेच्या ममतेने सेवा करुन सुटका केली. अशा वेळी कविवर्य मंगेश पाडगांवकर यांची कविता स्मरते...

हात हवेत मज नितांत वत्सल, क्षमाशील ते क्षमेहुनही
पुण्यशील जे गंगेहुनही, जे मायेचा घास भरविती
चिमण्या ओठी ।।

महात्मा फुलेंनी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन त्यांच्यातील अस्मिता जागृत केली. विद्याविभूषित सावित्रीबाई स्वयंप्रेरणेने एक कर्तृत्ववान स्त्री बनल्या. त्या केवळ पतीची छाया न रहाता त्यांनी महात्मा फुलेंच्या सामाजिक, शैक्षणिक कार्यात सिंहाचा वाटा उचलून स्वतःच्या कर्तृत्वाची छाप पाडली. त्यांनी अनेक कर्तृत्ववान स्त्रिया तयार केल्या. इ. स. १८५५ मध्ये ज्ञानोदय मासिकात मुक्ता नावाच्या १२ वर्षाच्या मातंग मुलीने ''वेदांचा अधिकार ब्राह्मज्ञांना दलितांना नाही मग आमचा धर्म कोणता?'' असा प्रश्न विचारला. सन १८८२ साली ताराबाई शिंदे या ९६ कुळी मराठा स्त्रीने ''स्त्री पुरुष समानता'' हे पुस्तक लिहून स्त्री मुक्तीची दारे खुली केली. इ. स. १८७३ साली सावित्रीबाईंनी सत्यशोधक पध्दतीने अनेक सामुदायिक विवाह लावून सावित्रीबाई रोडे ही सत्यशोधक चळवळीची बाणेदार कर्तृत्ववान धडाडीची नेता तयार केली. अशा तऱ्हेने सावित्रीबाईंनी आपल्या कार्याने कर्तृत्ववान स्त्रीयांचे युग तयार करुन युगश्री बनल्या.

सावित्रीबाई उत्कृष्ट साहित्यीक व कवयित्रीही होत्या. त्यांचे सारे लेखन अज्ञानी स्त्रिया, दलितांना अंधाराच्या गर्तेतून प्रकाशाच्या ज्योतीकडे नेण्यासाठी होते. जीवनाचा विकास व उद्योगप्रिय करण्यासाठी होते. त्यांच्या काव्याचे निसर्गविषयक, सामाजिक, प्रार्थनापर, आत्मपर, बोधपर, इतिहास विषय होते.

त्यांनी वयाच्या २३व्या वर्षी १८५३ला काव्यफुले काव्यसंग्रह लिहीला.

'सरोवर मानस, सुवासिक फुलांचे ।
तिथे बांधितो महाल कमळांचे ।
चार विद्येची चौसष्ट कलांची सुबक
नवरत्ने त्यावर रसांची ।'

नवस या सामाजिक कवितेत
गोट्याला शेंदूर फासुनि तेलात वसती देवात दगड तो ।
धोंडे मुले देती, नवसा पावती,
लग्न का करती नर नारी ।।
'शिकणेसाठी जागे व्हा' या कवितेत
असे गर्जुनी विद्या शिकण्या – जागे होऊन झटा ।
परंपरेच्या बेड्या तोडूनि–शिकण्यासाठी उठा ।
'शुद्रांचे दुखणे' या कवितेत
'बाईल काम करीत राही । ऐतोबा हा खात राही'
पशु पक्षात ऐसे नाही । तयास मानव म्हणावे का?
गुलामगिरीचे दुःख नाही । माणूसकीही समजत नाही ।
तयास मानव म्हणावे का?

इतिहास विषयक कवितांमध्ये
'छत्रपती शिवाजी, राणी छत्रपती ताराबाई' यांच्या कवितांचा समावेश आहे.
'ही एकच शूर रणगाजी छत्रपती ताराबाई – शिवधनू प्रतापी माझी वीरांची रण देवाई । ताराबाई माझी मर्दिनी, भासे चंद्रिका रणांगणी ।' रणदेवा ती श्रध्दास्थानी । नमन माझीये तिचे चरणी ।
शिवाजी कुळेवाडी भूषण छत्रपतींची थोरवी 'छत्रपती शिवाजी' या कवितेत म्हणोनी शिवाजी स्वराज्या उभारी समाजी अतिशूद्र लोकांस तारी ।।

मनुष्या आणि सुखी ठेवी त्यांना परि शिवसत्ता पुढे लाभली ना ।।

यानंतर १८९२ दीर्घकाव्य 'बावन्नकशी सुबोध रत्ना कर' प्रकाशित झाले. हे दीर्घकाव्य ५२ कडवी अेकटावी लिहीली. या काव्याचे प्रकाशन सत्यशोधक समाजाचे स्वामी लक्ष्मण शास्त्री सोनार होत. महात्मा

पान १४ वर पुढे

# जुळवुन घ्या



लेखन – डॉ. दत्ता कोहिनकर
माईंड पॉवर ट्रेनर
मो.: ९८२२६३२६३०

हेकेखोर स्वभाव व जुळवुन घेणे जमत नसल्याने केदार कुठल्याही नोकरीत स्थिर होत नव्हता. सासऱ्यांच्या ओळखीने त्यांला नामांकित कारखान्यात नोकरी लागली होती. ती पण त्याला टिकवता आली नाही. या गोष्टींचा त्यांच्या मनावर परिणाम होऊन तो नैराश्यात गेला. तीव्रता इतकी वाढली कि तो आक्रमक होऊन घरात वस्तू फेकणे, मारहाण करणे ईथपर्यंत त्याची मजल गेली. त्याची पत्नी नीता हिने आई-वडिलांच्या मदतीने केदारला समुपदेशक मानसोपचार तज्ज्ञांकडे नेले. सहा महिन्यांची रजा काढून केदारला गोळ्या देणे, भोजन, प्रेम, आधार, सहानुभूती बहाल करणे याला तिने विशेष प्राधान्य दिले. संपूर्ण, लक्ष्य केदारकडे देऊन त्याला नैराश्यातून बाहेर काढण्यात नीताला यश आले. त्याच वेळ जावा व आत्मविश्वास वाढावा म्हणून एका ओळखीच्या फर्म मालकाकडे नीताने केदारला कामावर ठेवून स्वतःच्या पर्समधून २०,०००/- मासिक पगार - फर्म मालकातर्फे केदारला द्यावयास लावला. केदार पूर्णतः बरा झाला. आज एका नामांकित कारखान्यात तो पाच आकडी पगार घेत आहे. नीताने केदारशी पूर्णतः स्वतःला जुळवून घेतलं म्हणून आज केदार व नीताचा संसार उभा राहिला.

खरोखर मित्रांनो ज्याला जुळवून घेता आलं त्याला सुखी जीवनाचं रहस्य उमगलं. विवेकानंद प्रार्थना करताना म्हणतात, ''हे ईश्वरा, या जगात मी जे बदलू शकतो ते बदलण्याची ताकद दे, जे मी बदलू शकत नाही त्याच्याबरोबर जुळवून घेण्याची कुवत मला दे व मी काय बदलू शकतो व काय बदलू शकत नाही हे समजण्याचं शहाणपण मला दे.'' कुठं जुळवून घ्यायचं व काय बदलायचं हे समजण्यासाठी प्रज्ञेची कास धरली पाहिजे. माणसाच्या आयुष्यात चढ-उतार, बॅडपॅच असतातच. त्यावेळेस त्याला परिस्थितीशी जुळवून घेता आलं पाहिजे. जुळवून घेणे ही एक कला आहे. जुळवून घेण्यास असमर्थ ठरणे हे मानसिक दौर्बल्य आहे. हे दौर्बल्य दूर करण्यासाठी मनाच्या सबलतेची व निर्मलतेची गरज असते. त्याकडे दुर्लक्ष केले तर ही माणसे मानसिक आजारांना बळी पडतात. आपण मुलांना पाहिजे ते त्वरित पुरवले तर लोकांशी व परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या त्यांच्या मानसिकतेत आपण अडथळा आणत असतो. मुलांना शाळेत जुळवून घेता आले नाही तर त्यांना शाळेची भीती वाटू लागते.

अभ्यासाशी जुळवून घेता अलं नाही तर न्यूनगंड वाढतो. घरच्यांशी जुळवून घेता आलं नाही कि नात्यात दरी वाढते. अशी मुले पुढं जाऊन सर्वच स्तरावर जुळवून घेण्यास असमर्थ ठरतात. मग त्यांना आयुष्य एक ओझं वाटू लागते. मीच का जुळवून घेऊ? अशा विचारांनी माणसे समजातून दूर फेकल्यामुळे एकटी पडतात व नैराश्यात जातात.

केदारला देखील लोकांशी जुळवून घेणे जमत नव्हते. त्यामुळे लोकांशी त्याचा सारखा वाद व्हायचा व हेकेखोर - भांडकुदळ स्वभावामुळे वरिष्ठांपर्यंत त्यांच्याबद्दलच्या तक्रारी जायच्या. शेवटी त्याची नोकरी जायची. नीताने मात्र परिस्थितीशी जुळवून घेतले व परिस्थिती बदलण्यासाठी योग्य दिशेने संयम, चिकाटी, ठेवून धीर न सोडता यथोचित प्रयत्न केले. औषध,

पान १६ वर पुढे

मुशाफिरी

## *रंगरंगीला राजस्थान-जयपूर - भाग २*



लेखन – सौ. माधुरी शिवाजी विधाटे
सदस्य – पिंपरी चिंचवड साहित्य मंच
नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ
मो.: ७५८८३२८४६९

गुलाबी रंगाच्या विविध छटा लेऊन सजलेली जयपूर नगरी म्हणजे जणू काही भरजरी गुलाबी शालू नेसलेली रुपगर्विताच भासते. 'पधारो म्हारो देस' असे सांगणाऱ्या रंगरंगील्या राजस्थानची ही राजधानी पिंक सिटी म्हणजेच गुलाबी शहर म्हणून ओळखले जाते. महाराजा सवाई जयसिंग यांनी वसवलेली ही सुंदर नगरी प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागतासाठी गुलाबी रंगाच्या विविध छटांमध्ये रंगवण्यात आली, तेव्हापासून तिला पिंक सिटी म्हणून ओळखतात. नगराचे सुनियोजन, कला स्थापत्याचा सुरेख संगम आणि पारंपारिक स्थानिक विविधतेची जपणूक या वैशिष्ट्यांच्या आधारावर या शहराचा समावेश युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये केला आहे.


सुंदर राजप्रसाद, भव्य किल्ले, आल्हाददायक बागबगीचे, विस्तीर्ण जलाशय, कलाकुसरीने नटलेल्या हवेल्या, अशी जयपुर नगरी पाहण्याचा खूप दिवसांचा मानस पाच वर्षांपूर्वी पूर्ण झाला. येथील सर्व इमारती, दुकाने, घरे, मंदिरे आणि राजवाड्यांच्या एकसारख्या गुलाबी दर्शनी भागाने मन मोहून घेतले.

जयपूरचे महाराजा जयसिंग द्वितीय यांच्या सिटी पॅलेस या भव्य राजवाड्याला प्रथम भेट दिली. सुंदर कोरीवकाम केलेल्या संगमरवरी दोन गजराजांनी प्रवेशद्वारावर स्वागत केले. भव्य प्रांगणातील लाल गुलाबी रंगातील अतिशय सुंदर राजवाड्याचे कमानदार गवाक्ष, नाजूक कलाकुसर केलेल्या भिंती, स्तंभ आणि छत तसेच छतावरील हंड्या झुंबरांची नेत्रसुखद मेजवानी मिळाली. या राजवाड्याच्या काही भागाचे चित्र दालन आणि संग्रहालयात रूपांतर केले आहे. येथील राजामहाराजांच्या वस्त्र प्रावरणांचे भांडार आणि आकर्षक जडावकाम केलेल्या तलवारी व शस्त्राचे भांडार, मखमली गालीचे, सुंदर लघुचित्रे, गंगाजली नावाचे चांदीचे दोन मोठे कलश हे बघताना वेळ कसा गेला हे समजलेच नाही. येथील सातमजली चंद्र महालात महाराजांच्या शाही परिवाराचे निवासस्थान होते. मुबारक महाल, दिवाणे आम, महाराणी पॅलेस, गोविंद देवजी मंदिर महाराजांची सौंदर्यदृष्टी, कलाप्रेम, संस्कृतिप्रियता आणि शौर्यगाथा सांगत आहेत असे वाटले.

तिथून मानसागर सरोवरात मधोमध डौलाने उभा राहिलेला जलमहाल पाहिला. एखादी देखणी जलपरी जलाशयातून बाहेर यावी अशा या मोहक रूपाने मन वेधून घेतले. जलाशयाच्या मध्यभागी असल्यामुळे याला आयबॉल म्हणतात. महाराजा जयसिंग द्वितीय यांनी आपल्या राणी वशासाठी याची निर्मिती केली आहे. या पाच मजली वास्तूचे चार मजले पाण्यात असून वरील एकच मजला दृष्टीला पडला. येथे प्रत्यक्ष प्रवेश करायला बंदी असल्यामुळे तीरावरून दर्शन घेतले. राजस्थानी व मोगल स्थापत्यकलेचा संगम असलेल्या या महालाचे गवाक्ष कमानदार महिरपींनी सजले होते. जलाशयाच्या पाठीमागे अरवली पर्वतरांगा, महालाच्या छतावरील हिरवी वनराई, महालाचे देखणे घुमट व मेघडंबरी या पार्श्वभूमीवर पाखरे भिरभिरत होती. मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित पक्षी येत असल्याने पक्षी निरीक्षणासाठी हे अतिशय उत्तम स्थळ आहे. संध्याकाळच्या सोन उन्हात

